## saamanaa

**maMgaLvaar id.16.04.2019 saMBaajaInagar.**

# बजाज रुग्णालयातर्फे घाटीला साडेपाच लाखांची औषधी

संभाजीनगर, दि. १५ (प्रतिनिधी)- शहरातील कमलनयन बजाज रुग्णालयातर्फे आज सोमवारी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय अर्थात घाटीस ५ लाख ५० हजार रुपयांची औषधी आणि वैद्यकीय साहित्य देण्यात आले.

कमलनयन बजाज रुग्णालय, मराठवाडा मेडिकल अॅण्ड रिसर्च इन्स्टिट्यूटचे विश्वस्त सी. पी. त्रिपाठी, नंदकिशोर कागलीवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर आणि औषध भांडारप्रमुख डॉ. माधुरी कुलकर्णी यांच्याकडे ही औषधी पत्रकारांच्या उपस्थितीत सुपूर्द करण्यात आली. याप्रसंगी बजाज रुग्णालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आलोक श्रीवास्तव, औषध विभागप्रमुख अमोल पाटील यांची उपस्थिती होती.

यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना सी. पी. त्रिपाठी म्हणाले, अत्यावश्यक औषधी गरजू रुग्णांना मदतीच्या स्वरूपात पुरवावी, अशी विनंती घाटीच्या अधिष्ठातांकडून २८ फेब्रुवारीच्या पत्रात करण्यात आली. रुग्णालयातच कार्यरत असल्याने मला अडचणींची जाणीव आहे. त्यामुळे औषधींची मदत केली. याबरोबर शासकीय दंत महाविद्यालयास रुग्णवाहिका देण्याची प्रक्रिया सुरू आहे. घाटीला ६ कोटींचे लेक्चर थिएटर तयार करून देण्यासाठीही प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. या रुग्णालयाबरोबर इतरांनीही मदत केली तर घाटीतील अडचणी दूर होण्यास मदत होईल, असे डॉ. कानन येळीकर यावेळी म्हणाल्या.

### ही औषधी मिळाली

मोकाट कुत्र्याच्या चाव्यानंतर महत्त्वपूर्ण ठरणारी एआरव्ही आणि एआरएस इंजेक्शनची प्रत्येकी १०० वायल्स देण्यात आली. त्यामुळे मोकाट कुत्रा चावल्यानंतर इंजेक्शनसाठी रुग्णांची होणारी गैरसोय किमान काही दिवस टळणार आहे. याबरोबरच अधेसिव्ह प्लास्टर, पोवीडाईन आयोडिन, अबसोर्बनेंट गॉज या बाबी घाटी रुग्णालयास देण्यात आल्या.



*घाटीतील गरीब रुग्णांसाठी साडेपाच लाखांची औषधी अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर आणि औषध भांडारप्रमुख डॉ. माधुरी कुलकर्णी यांच्याकडे सुपूर्द करताना सी. पी. त्रिपाठी, नंदकिशोर कागलीवाल, बजाज रुग्णालयाचे सीईओ डॉ. आलोक श्रीवास्तव.*

**idvya marazl**

**maMgaLvaar id.16.04.2019 AaOrMgaabaad.**

# कमलनयन बजाज हॉस्पिटलने घाटीला दिली लाखांची औषधी

प्रतिनिधी | प्रतिनिधी

कमलनयन बजाज हॉस्पिटलने सोमवारी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास (घाटी) ५ लाख ५० हजार रुपयांची औषधी आणि वैद्यकीय साहित्य दिले.

कमलनयन बजाज रुग्णालय, मराठवाडा मेडिकल अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, विश्वस्त सी. पी. त्रिपाठी, नंदकिशोर कागलीवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत ही औषधी अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर आणि औषध भांडारप्रमुख डॉ. माधुरी कुलकर्णी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. या वेळी बजाज रुग्णालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आलोक श्रीवास्तव, औषध विभागप्रमुख अमोल पाटील उपस्थित होते.

**रुग्णालयातच कार्यरत असल्याने अडचणीची जाणीव** : या वेळी बोलताना त्रिपाठी म्हणाले, अत्यावश्यक औषधी गरजू रुग्णांना मदतीच्या स्वरूपात पुरवावी, अशी विनंती घाटी प्रशासनाच्या वतीने करण्यात आली होती. मी स्वत: रुग्णालयातच कार्यरत असल्याने मला अडचणींची जाणीव आहे. त्यामुळे औषधींची मदत केली. याबरोबर शासकीय दंत महाविद्यालयास रुग्णवाहिका देण्याची प्रक्रिया सुरू आहे. घाटीला ६ कोटींचे लेक्चर थेटर तयार करून देण्यासाठीही प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

## ही औषधी मिळाली

मोकाट कुत्र्याच्या चाव्यानंतर महत्त्वपूर्ण ठरणारी एआरव्ही आणि एआरएस इंजेक्शनची प्रत्येकी १०० वायल्स देण्यात आली. त्यामुळे मोकाट कुत्रा चावल्यानंतर इंजेक्शनसाठी रुग्णांची होणारी गैरसोय थांबेल. याबरोबरच अधेसिव्ह प्लास्टर, पोवीडाइन आयोडिन, अबसोर्बेंट गॉज घाटी रुग्णालयाला देण्यात आली.

सकाळ

# घाटीला मिळाली साडेपाच लाखांची औषधी

» सुखद

## कमलनयन बजाज रुग्णालयाची मदत : 'सीएसआर'मधून आवाहन

**औरंगाबाद, ता. १५ : घाटी रुग्णालय गोरगरीब, गरजू रुग्णांना वैद्यकीय सेवा पुरवीत आहे. या कामात येणाऱ्या अडचणी सोडवून मदत करणे समाजाचे दायित्व आहे. मदतीसाठी समाजाने पुढे येण्याची गरज आहे; तसेच घाटीनेही तसा विश्वास त्यांच्या कार्यातून निर्माण करणे गरजेचे असल्याचे मत 'नाथ ग्रुप'चे प्रमुख नंदकिशोर कागलीवाल यांनी व्यक्त केले.**

### 'मोकाट कुत्र्यांवर कारवाई व्हावी'

मोकाट कुत्र्यांच्या चाव्यानंतर एआरव्ही आणि एआरएस इंजेक्शनची आवश्यकता भासते. मागणीनुसार उत्पादन नसल्याने तुटवडा होतो. महागड्या औषधींचा बोजा रुग्णांवर पडतो. महापालिकेला औषधीसाठी विनंती केली आहे. मात्र, कुत्र्यांच्या चाव्याच्या घटना कमी होण्यासाठी शहरातील वाढलेल्या कुत्र्यांची संख्याही कमी करण्यासाठी महापालिकेने पावले उचलणे गरजे असल्याचे डॉ. येळीकर म्हणाल्या.

कमलनयन बजाज रुग्णालयाच्या वतीने साडेपाच लाखांची औषधी सोमवारी (ता. १५) त्यांच्या हस्ते घाटी रुग्णालयाला सुपूर्द करण्यात आली.

मराठवाडा मेडिकल अॅण्ड रिसर्च इन्स्टिट्यूटचे विश्वस्त सी. पी. त्रिपाठी, अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर, औषध भांडार प्रमुख डॉ. माधुरी कुलकर्णी, बजाज रुग्णालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आलोक श्रीवास्तव, अमोल पाटील यांची उपस्थिती होती. यानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना सी. पी. त्रिपाठी म्हणाले, की घाटीला साडेसहा कोटींचे लेक्चर थिएटर 'सीएसआर'मधून देण्यावर बजाज विचार करीत आहे; तसेच शासकीय दंत महाविद्यालयास रुग्णवाहिका देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सीएसआरच्या माध्यमातून मदत करण्याचे आवाहन या वेळी अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर यांनी केले.



**औरंगाबाद : घाटीला औषधी सुपूर्द करताना (डावीकडून) डॉ. आलोक श्रीवास्तव, सी. पी. त्रिपाठी, नंदकिशोर कागलीवाल, डॉ. कानन येळीकर, डॉ. माधुरी कुलकर्णी.**

Aurangabad, Aurangabad-Today
16/04/2019 Page No. 8

लोकमत

**मदतीचा हात :** रेबीज इंजेक्शनसह वैद्यकीय साहित्यांचा पुरवठा, ५.५० लाख रुपयांच्या औषधींमुळे तुटवडा दूर

# कमलनयन बजाज रुग्णालयातर्फे घाटीला औषधी

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** शहरातील कमलनयन बजाज रुग्णालयातर्फे सोमवारी (दि. १५) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास (घाटी) ५ लाख ५० हजार रुपयांची औषधी आणि वैद्यकीय साहित्य देण्यात आले. त्यामुळे घाटीतील तुटवडा किमान काही प्रमाणात दूर होण्यास हातभार लागला.

कमलनयन बजाज रुग्णालय, मराठवाडा मेडिकल अँण्ड रिसर्च इन्स्टिट्यूटचे विश्वस्त सी. पी. त्रिपाठी, नंदकिशोर कागलीवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर आणि औषध भांडारप्रमुख डॉ. माधुरी कुलकर्णी यांच्याकडे औषधी सुपूर्द करण्यात आली.



**कमलनयन बजाज रुग्णालयातर्फे अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर आणि डॉ. माधुरी कुलकर्णी यांच्याकडे औषधी सुपूर्द करताना सी. पी. त्रिपाठी, नंदकिशोर कागलीवाल, डॉ. आलोक श्रीवास्तव.**

## ही औषधी मिळाली

- **मोकाट कुत्र्याच्या चाव्यानंतर महत्त्वपूर्ण ठरणारी एआरव्ही आणि एआरएस इंजेक्शनची प्रत्येकी १०० वायल्स देण्यात आली. त्यामुळे मोकाट कुत्रा चावल्यानंतर इंजेक्शनसाठी रुग्णांची होणारी गैरसोय किमान काही दिवस टळणार आहे. याबरोबरच अधेसिव्ह प्लास्टर, पोवीडाईन आयोडिन, अबसोर्बनेंट गॉज या बाबी घाटी रुग्णालयास देण्यात आल्या.**

## मोकाट कुत्रेही कमी करावे

- **घाटीत रेबीज लसची कमतरता असते. त्याचा पुरवठा वाढवावा, असे सांगितले जाते; परंतु त्यांचा पुरवठा वाढविण्यापेक्षा शहरातील मोकाट कुत्र्यांची संख्या कमी केले पाहिजे. या रुग्णालयाबरोबर इतरांनीही मदत केली तर घाटीतील अडचणी दूर होण्यास मदत होईल, असे डॉ. येळीकर म्हणाल्या.**

याप्रसंगी बजाज रुग्णालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आलोक श्रीवास्तव, औषध विभागप्रमुख अमोल पाटील यांची उपस्थिती होती.

यावेळी पत्रकार परिषदेत बोलताना सी. पी. त्रिपाठी म्हणाले, अत्यावश्यक औषधी गरजू रुग्णांना मदतीच्या स्वरूपात पुरवावी, अशी विनंती करण्यात आली. रुग्णालयातच कार्यरत असल्याने मला अडचणींची जाणीव आहे. त्यामुळे औषधींची मदत केली. याबरोबर शासकीय दंत महाविद्यालयास रुग्णवाहिका देण्याची प्रक्रिया सुरू आहे. घाटीला ६ कोटींचे लेक्चर थिअटर तयार करून देण्यासाठीही प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

पुढारी




अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर, औषधी भांडार प्रमुख डॉ. माधुरी कुलकर्णी यांना औषधीसाठा सुपूर्द करताना बजाजचे विश्वस्त.

# घाटीला मिळाली साडेपाच लाखांची मोफत औषधी

**औरंगाबाद, प्रतिनिधी** : कमलनयन बजाज रुग्णालयातर्फे सोमवारी (दि.१५) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास (घाटी) साडे पाच लाखांची औषधी आणि वैद्यकीय साहित्य देण्यात आले. विश्वस्त सी. पी. त्रिपाठी, नंदकिशोर कागलीवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर आणि औषध भांडार प्रमुख डॉ. माधुरी कुलकर्णी यांच्याकडे औषधी सुपूर्त करण्यात आली.

शासकीय दंत महाविद्यालयास रुग्णवाहिका देण्याची प्रक्रिया सुरू आहे. घाटीला ६ कोटी लेक्चर थिएटर तयार करून देण्यासाठीही प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. या रुग्णालयाबरोबर इतरांनीही मदत केली तर घाटीतील अडचणी दूर होण्यास मदत होईल, असे डॉ. येळीकर म्हणाल्या. मिळालेल्या औषधांमध्ये मोकाट कुत्र्याच्या चाव्यानंतर महत्त्वपूर्ण ठरणारी एआरव्ही आणि एआरएस इंजेक्शनची प्रत्येकी १०० वायल्स देण्यात आली. त्यामुळे मोकाट कुत्रा चावल्यानंतर इंजेक्शनसाठी रुग्णांची होणारी गैरसोय किमान काही दिवस टळणार आहे. याबरोबरच अधेसिव्ह प्लास्टर, पोवीडाईन आयोडिन, अबसोर्बनेंट गॉज या बाबी घाटी रुग्णालायस देण्यात आल्या.

My Aurangabad Edition
16 Apr, 2019 Page No. 6
Powered by : erelego.com

Lokmat Times

# Bajaj Hospital lends a helping hand to GMCH

## Donates medicines, equipment worth ₹5.5L

LOKMAT NEWS NETWORK
AURANGABAD, APRIL 15

The Kamal Nayan Bajaj Hospital donated medicines and equipment worth Rs 5.5 lakh to the Government Medical College and Hospital on Monday.

It includes rabies vaccination. This stock will help minimize medicine shortage at GMCH, it is believed.

Kamal Nayan Bajaj Hospital and Marathwada Medical and Research Institute Trustees S P Tripathi, Nandkishor Kagliwal were present on the occasion.

The medicine stock was handed over to GMCH dean Dr Kanan Yelikar and medicine stock chief Dr Madhuri Kulkarni. Bajaj Hospital CEO Dr Alok Shrivastava, medicine department chief Amol Patil were also present.

Speaking in the press conference, Tripathi said, "The hospital was requested to supply emergency medicines to needy patients as a help. The medicines were supplied because I work with a hospital and can understand the problem."

He added that the process of donating an ambulance to the government dental college has been started and efforts are being taken to create a lecture theatre worth Rs 6 crore for GMCH.

### Rabies vaccine

The stock of ARV and ARS that are necessary for stray dog bites have been supplied and it will help treat such patients for some days. In addition to it, the adhesive plaster, povidone iodine, absorbent gauze and other material were given to the GMCH.

While availability of rabies vaccination is important, the local authorities should also take efforts to reduce the number of stray dogs, said GMCH dean Dr Kanan Yelikar.

महाराष्ट्र टाइम्स



घाटी रुग्णालयाला साडेपाच लाखांची औषधी देताना सी. पी. त्रिपीठी, नंदकिशोर कागलीवाल, डॉ. कानन येळीकर, डॉ. माधुरी कुलकर्णी.

# 'कमलनयन'कडून घाटीला साडेपाच लाखांची औषधी

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

मराठवाड्यातील सर्वांत मोठे रुग्णालय असलेल्या घाटीमध्ये औषधांची तीव्र टंचाई लक्षात घेऊन कमलनयन बजाज रुग्णालयाच्या वतीने घाटीला सोमवारी (१५ एप्रिल) सुमारे साडेपाच लाखांची औषधी तसेच वैद्यकीय साहित्य देणगी स्वरुपात देण्यात आले. 'कमलनयन'मध्ये आयोजित एका छोटेखानी कार्यक्रमात औषधी तसेच साहित्य घाटीला सुपूर्द करण्यात आले.

## 'एआरव्ही'सह विविध औषधी, साहित्याचा समावेश

या प्रसंगी मराठवाडा मेडिकल अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित 'कमलनयन'चे विश्वस्त सी. पी. त्रिपाठी, विश्वस्त व ज्येष्ठ उद्योजक नंदकिशोर कागलीवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आलोक श्रीवास्तव, औषधी विभागप्रमुख अमोल पाटील, घाटीच्या अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर, घाटीच्या औषधी भांडारप्रमुख डॉ. माधुरी कुलकर्णी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

'कमलनयन'कडून देण्यात आलेल्या औषधांमध्ये श्वानदंशावरील 'एआरव्ही' इंजेक्शनसह प्लास्टरचे साहित्य, गॉज, आयोडिन आदींचा समावेश आहे. या निमित्त, गोरगरीब रुग्णांवर मोठ्या प्रमाणावर उपचार केल्या जाणाऱ्या घाटीच्या मदतीसाठी समाजातील विविध घटकांनी पुढे यावे, असे आवाहन त्रिपाठी यांनी केले. तर, घाटीतील औषधांच्या तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर विविध संस्था, संघटना, कंपन्या या 'सीएसआर'च्या माध्यमातून घाटीला मदत करू शकतात. त्यासाठीच स्वतंत्र सीएसआर खाते उघडण्यात आले आहे व या माध्यमातून मदत करणाऱ्यांना अधिकृत सवलतीही मिळतात, असे डॉ. येळीकर म्हणाल्या. या वेळी कागलीवाल यांनीही मनोगत व्यक्त केले.

## साडेसहा कोटींचे थिअटर विचाराधीन

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी (घाटी) अत्याधुनिक स्वरुपाचे प्रशस्त 'लेक्चर थिएटर' प्रस्तावित असून, या उपक्रमासाठी साडेसहा कोटींचा निधी अपेक्षित आहे. हा निधी 'सीएसआर'च्या माध्यमातून देण्याचा निर्णय विचाराधीन आहे. वरिष्ठ स्तरावरून मान्यता मिळताच, निधीचा मार्ग मोकळा होणार आहे, असेही डॉ. त्रिपाठी म्हणाले. त्याचवेळी ग्रामीण तसेच दुर्गम भागात जाऊन दंतोपचारांच्या सेवा देण्याच्या उद्देशाने शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयाला दोन डेंटल व्हॅन देण्याचाही विचार सरू असल्याचे ते म्हणाले.

पुण्य नगरी

मंगळवार
१६ एप्रिल २०१९
औरंगाबाद 5

# घाटीला साडेपाच लाख रुपयांच्या औषधींची मदत

**औरंगाबाद / प्रतिनिधी**

शहरातील कमलनयन बजाज रुग्णालयातर्फे सोमवारी (दि. १५) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास (घाटी) ५ लाख ५० हजार रुपयांची औषधी आणि वैद्यकीय साहित्य देण्यात आले.

कमलनयन बजाज रुग्णालय, मराठवाडा मेडिकल अ‍ॅण्ड रिसर्च इन्स्टिट्यूटचे विश्वस्त सी. पी. त्रिपाठी, नंदकिशोर कागलीवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर आणि औषध भांडार प्रमुख डॉ. माधुरी कुलकर्णी यांच्याकडे औषधी सुपूर्द करण्यात आली. याप्रसंगी बजाज रुग्णालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आलोक श्रीवास्तव,



औषध विभाग प्रमुख अमोल पाटील यांची उपस्थिती होती.

औषधांमध्ये एआरव्ही आणि एआरएस इंजेक्शनची प्रत्येकी १०० वायल्स देण्यात आली. त्यामुळे मोकाट कुत्रा चावल्यानंतर इंजेक्शनसाठी रुग्णांची होणारी गैरसोय किमान काही दिवस टळणार आहे. याबरोबरच अधेसिव्ह प्लास्टर, पोवीडाईन आयोडिन, अबसोर्बेंट गॉज या बाबी घाटी रुग्णालयास देण्यात आल्या.

# THE TIMES OF INDIA

**Tuesday, April 16, 2019**

# GMCH receives free drugs worth ₹5.5L from pvt hosp

## Medicines Sought For Catering To Emergencies

TIMES NEWS NETWORK



TOI

Kamalnayan Bajaj Hospital made the donation to the government hospital

**The district-level hospital caters to around 2,000 Outpatient department (OPD) patients and 800 to 900 Inpatient department (IPD) patients on a daily basis. These patients, coming from various districts of Marathwada, are from economically weak backgrounds who cannot afford to buy medicines from private vendors**

**Aurangabad:** The Government Medical College and Hospital (GMCH), which has been gripped with shortage of drugs for long, heaved a sigh of relief on Monday when it received the consignment of drugs worth Rs 5.5 lakh that it had requested from Kamalnayan Bajaj Hospital to meet its emergency requirements.

A discussion had ensued between the GMCH and the Marathwada Medical and Research Institute (MMRI), Kamalnayan Bajaj Hospital, on the assistance required by GMCH where in the state-run hospital had decided upon the set of drugs it required on a priority basis.

GMCH had requested MMRI to provide 100 vials of Antiretroviral (ARV) injections and 100 vials of equirab injections which are used in the treatment of dog bites. The hospital had also asked for adhesive plaster (500), povidine iodine solution (100) and absorbent gauze (1000) used for dressing.

As part of its Corporate Social Responsibility (CSR), the administration of Kamalnayan Bajaj Hospital handed over the medicines and medical supplies to GMCH administration on Monday. MMRI's C P Tripathi, Nandkishore Kagliwal, GMCH dean Kanan Yelikar, head of medicine store Madhuri Kulkarni, CEO of Kamalnayan Bajaj Hospital Alok Srivastava were present during the handover.

Yelikar thanked the hospital for its initiative at the occasion. She made an appeal to various corporates and organisations to come forward to help GMCH ensure drug availability. The district-level hospital caters to around 2,000 Outpatient department (OPD) patients and 800 to 900 Inpatient department (IPD) patients on a daily basis. These patients, coming from various districts of Marathwada, are from economically weak backgrounds who cannot afford to buy medicines from private vendors.

Tripathi said that before providing assistance for any project, Bajaj's CSR wing undertook intense vetting to ensure that the money was being shelled out for the right cause. GMCH is always short of one day's medicine supply every month.

"We have found out that GMCH has been sincerely working and its software-dependant drug management system reduces chances of corruption. We are glad to help GMCH. More initiatives to help the hospital in the future cannot be denied," said Tripathi. The hospital administration also appealed to people to help it tide over the drug crisis.